ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# महाराष्ट्र तत्वदर्शनः संत श्रीगुलाबराव महाराजांच्या ज्ञानेश्वर मधुराव्दैत संप्रदायांचे तत्वज्ञान

*डॉ. विजय सोपानराव शेडगे,

*प्रमुख, तत्वज्ञान विभाग, अगस्ति कला वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय ता.अकोले, जि. अहमदनगर

## प्रस्तावना :

महाराष्ट्राच्या पुण्यभूमीत अनेक संतमहात्म्यांनी आपले अवतार कार्य केले. ऋषीमुनींपासून ते आजपर्यंत अनेक प्रतिभावान तत्वज्ञ आणि संत महात्म्यांनी भारतीय संस्कृतीचे संगोपन केले. या ंसतांच्या मालिकेमध्ये संत ज्ञानदेवांपाठोपाठ भक्तीच्या माध्यमातून समाजाला समतेची, विश्वबंधुत्वाची जाणीव संत श्री गुलाबराव महाराजांनी अवघ्या ३४ वर्षाच्या अल्प आयुष्यात करुन दिली. विसाव्या शतकातील इ. सन. १८८१ ते १९१५ हा कालावधी म्हणजे इंग्रजी गुलामगिरीचा काळ. या कालावधीत महाराजांनी भारतीय शास्त्राचे श्रेष्ठत्व व भक्तीचे महत्त्व समाजाला पटवून दिले. वैदिक सूक्तांमध्ये अनुस्थूत असलेली माधुर्यभक्ती हीच महाराजांच्या मधुराव्दैत संप्रदायाची अधिष्ठात्री देवता आहे. शंकराचार्यांनी वेदात असलेले अव्दैत ज्ञानाचे महत्त्व पुनः प्रस्थापित केले व अव्दैत आणि वेदात चालत आलेली माधुर्यभक्ती या दोहोंना एकत्र करुन महाराजांनी श्री ज्ञानेश्वर मधुराव्दैत संप्रदायाची स्थापना केली.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

## संत गुलाबरावमहाराजांचे संक्षिप्त चरित्रः

महाराजांचे नांव - श्री गुलाबराव गोंदुजी मोहोड, जन्मांध आणि अल्पायुष्य - वय चौतीस वर्षे (इ. स. १८८१ ते १९१५) महाराजांनी शंकर अव्दैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय करुन भक्तिशास्त्राची निर्मिती केली. भक्तीच्या १६ नव्या प्रकारांची मांडणी केली. महाराज मधुराव्दैताचे आचार्य असल्याने त्यांनी ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन करुन माधुर्यभक्तिवरील आक्षेपांचे निराकारण केले व तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन केले. संत गुलाबराव महाराज स्वतःला ज्ञानेश्वर महाराजांची कन्या मानत होते. शरीर पुरुषाचे असले तरी मी एक स्त्रीच आहे. एक गोपिका आहे, मी ईश्वराची म्हणजे श्रीकृष्णाची पत्नी आहे या भावनेत निमग्न राहून ते स्त्रीवेश धारण करीत. स्वतः ज्ञानेश्वरकन्या असल्यामुळे

कृष्णपत्नीच्या पदाचा अधिकार मिळविण्यासाठी त्यांनी 'कात्यायनी' व्रत केले.हे कात्यायनी व्रत "भागवता" तील दशमस्कंधात सांगितले आहे. हे व्रत करुन श्रीकृष्णाच्या रासक्रीडेचा अधिकार गोपींनी मिळवला असे भागवतात म्हटले आहे. नदीच्या काठावर वाळूचा महादेव करुन तेहतीस दिवसाचे व्रत महाराजांनी प्रथम केले त्यावेळी महाराज

म्हणतात,

"प्रेमाचा करु कळस। हरिस अर्पू ब्रहारस
श्रीकृष्णपदी सावकाश। भृंगी होऊ चला"

(गुलाबराव महाराज अभंगगाथा)

विरहीणीच्या विरहप्रेमातील विषयभाव वेगळा करुन ते प्रेम भगवंताला अर्पण केले की, त्याला माधुर्यभक्ती म्हणतात. महाराजांनी पुरुषांनी दास्य भक्तीपासून व स्त्रियांनी वात्सल्य भक्तीपासून सुरुवात करावी असेच सर्वत्र सांगितले. आणि आत्मज्ञान झाल्याशिवाय माधुर्यभक्तीचा अधिकार येत नाही हे स्पष्ट केले. यातून निर्माण होणारे गोपी-कृष्ण प्रेमाचे अव्दैत मधुर होय. या अव्दैताला "मधुराव्दैत" व महाराजांना "मधुराव्दैताचार्य" असे म्हणतात.

श्रीमहाराजांनी भक्तीला अव्दैताची बैठक देऊन भक्तिशास्त्राची मांडणी केली. त्यात माधुर्यभक्तीचे सर्वश्रेष्ठत्व तर दाखवून दिलेच पण त्याबरोबर स्वतः ज्ञानेश्वर कन्या होऊन तत्वज्ञान सांगितले होते. त्याला त्यांनी सगुणभक्तीची जोड देऊन इतर संतांप्रमाणे भक्तीपर रसाळ अभंगरचना केली व सुमारे १३० ग्रंथांची निर्मिती केली.

**संत श्रीगुलाबराव महाराजांच्या ज्ञानेश्वर मधुराव्दैत संप्रदायातील तत्वज्ञान:**

ज्ञानेश्वरकन्या संत श्री गुलाबराव महाराजांनी ज्ञानेश्वर मधुराव्दैत संप्रदायाची स्थापना केली. भारतीय परंपरेत अव्दैताचे दोन संप्रदाय प्रमुख मानले जातात.

१) **शंकर सांप्रदाय:-** हा संप्रदाय भगवान नारायणापासून तयार झाला त्यात उपास्य शंकर व गुरुरुपाने विष्णूची भक्ती केली जाते.

२) **नाथसंप्रदाय:** हा संप्रदाय भगवान शंकरापासून तयार झाला. या संप्रदायात उपास्य विष्णू व गुरुरुपाने शिव आहेत.

या दोन्हीही संप्रदायांत शिवविष्णूचे अव्दैत आहे. त्यामुळे उपासकांचे (भक्तीचे) उपास्य देवतेशी अव्दैत

प्रस्थापित होते व त्यांना शुध्द ब्रह्मस्थिती प्राप्त होते. ही अव्दैतस्थिती प्राप्त झाल्यानंतरही एकच ब्रहम ब्रहमरुप होऊन स्वतःच्या आनंदाचा पुनः पुनः आस्वाद घेत असते. ही ब्रह्माची निष्प्रयोजन स्वभाविक क्रीडा आहे हाच चिद्विलास किंवा हीच पराभक्ती.

या भक्तीचे दास्यापासून आत्मनिवेदनापर्यत आणि लालन, वात्स्यल्य व माधुर्य भक्तीपर्यत सोळा प्रकार महाराजांनी वेगवेगळे करुन विशद केले आहेत. त्यांची पुढे सविस्तर मांडणी केली यामध्ये माधुर्यभक्ती सर्वश्रेष्ठ आहे. कारण तिच्यात भक्तीचे इतर सर्व प्रकार अनुस्युत आहेत. म्हणून अव्दैत तत्वज्ञानाच्या भक्तिशास्त्राची नावीन्यपूर्ण मांडणी त्यांनी केली आहे.

अनादी माधुर्यसंप्रदायाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी या कलियुगात श्री ज्ञानेश्वर मधुराव्दैत संप्रदायाची स्थापना केली आहे. असे महाराज आपल्या "संप्रदायसुरतरु" या ग्रंथात म्हणतात. माधुर्यभक्तीची रसाळ फळे मिळण्यासाठी या संप्रदायाला अनुसरुन आचरण करणे व मनाला वळण लावणे व सतत ब्रह्मप्राप्तीचा अनुभव घेण्याचा मार्ग हा ग्रंथात

सांगितला आहे.

" श्रीमान ज्ञानेश्वराचार्य, उमामात, शिवःपिता।
पतिः कृष्णो, राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम्।।"

(संप्रदाय सुरतरु - उपास्य पंचक)

या संप्रदायात सर्व गोपिका भगिनीरुपाने आहेत, शिव, उमा, श्रीकृष्ण, गोपिका व श्रीज्ञानदेव यांचे अत्यंत अव्दैत असून प्रेमासाठीच पंचायतन रुपाने ते नटले आहेत.

आदिनाथ शंकर व मत्स्येंद्रनाथ यांच्यापासून या संप्रदायाची नाथपरंपरा असून ज्ञानेश्वरमहाराजांनी स्वतः उपदेश करुन महाराजांना कृतार्थ केले असे त्यांनी सांगितले आहे. श्रीकृष्णाचे प्रेम करणे हे शंकरापासूनच शिकले पाहिजे प्रेमाची सर्वश्रेष्ठ आवस्था माधुर्य ही असून त्यातच लालन वात्सल्यादी सर्व प्रेमवृत्ती भगवंतावर अर्पण होऊ शकतात. भगवान शंकरांनीही गोपी होऊन रासक्रीडेत भाग घेतला होता. असा भक्तीचा इतिहास आहे.

**सांप्रदायाची तीर्थस्थाने:**

" अलंदिहिमवान काशी प्रयागो वज्रमंडलम
पंढरी चेति तीर्थानां षट्कमिष्टं इति निर्णयः।।"

(यस्टी- १६-पान-१७३)

आळंदी, हिमालय, काशी, प्रयाग, व्रजमंडल (वृंदावन) आणि पंढरपूर ही या संप्रदायाची तीर्थस्थाने आहेत. वारकरी संप्रदायात पंढरपूर क्षेत्र महत्त्वाचे आहे. तर या संप्रदायात वृंदावन महत्त्वाचे मानले जाते. कारण यामध्ये श्रीकृष्ण पतिरुपाने असल्याने माधुर्यभक्ती मुख्य आहे. त्यामुळे वृंदावन हे सासर मानले आहे.

**मधुराभक्तीचे वैदिक काळातील स्थानः**

वैदिक काळामध्ये मधुराभक्तीला अतिमहत्वाचे स्थान आहे. वैदिककाळात अनेक ऋषीमुनींनी वैदिक ऋचांच्या साहयाने हिरण्यगर्भ, सविता, नारायण, इंद्र, वरुण इत्यादी देवतांची (स्तुती) भक्ती करताना या देवतांना पती मानुन आपण पत्नीत्वाने आळविले आहे. यालाच माधुर्यभक्ती म्हणतात.

" अच्छा म इन्द्रं मतयः स्वर्विदः सध्रीचीर्विश्वा उशतीरनूषत।
परिष्वजन्ते जनयो यया पर्ति मर्यन शुच्युं मधवानमुलये।।"

(ऋग्वेद - १०.४३.१)

पत्नी पतीला अलिंगन देतात त्याप्रमाणे इंद्राला मी केलेल्या स्तुती अलिंगन देत आहेत. त्याचप्रमाणे

"ग्राव इव ग्रामं यूयुधिरिवाश्वान्वाश्रेव वत्सं सूमना दुहाना।
पतिरिव जायाममि नो न्येतू धर्ता दिवः सविता विश्ववारः।।"

(ऋग्वेद – १०-१४९-४)

पती आपल्या पत्नीकडे ज्याप्रमाणे येतो त्या प्रेमाने सवित्याने आमच्याकडे यावे.
सृष्टीच्या आरंभी एकच असलेले आत्मतत्त्व पती आणि पत्नी या दोन रुपाने प्रगट झाले आहे.

" आत्मैवेदमग्र आसीत्पुरुष विधः। स नैव रेमे। तस्मादेकाळी नरमते।
व्दितीयमैच्छत। सहैतावानास यथा स्त्रीपुमांसौ संपरिष्वकतौ।
सइममेवात्मानं व्देधापातयत्। ततः पतिश्च पत्नी चाभवतात्।।"

(बृहदारण्यकोपनिषद १-४-१३)

प्रारंभी एकच असलेले आत्मतत्व, त्याला करमेना म्हणून स्त्री पुरुष या दोन रुपाने अभिव्यक्त झाले.
ऋग्वेदातील पुढील ऋचा पती पत्नीच्या अतिउत्कट माधुर्याची जाणीव करुन देते.

" इभा पन्नास सृष्टुति नवीयसी वोचेयमस्मा उशते शृणोतु नः।
भूया अन्तरा ह्यस्य निस्पृशे जावेस पत्ये उशती सुवासः"

(बृहदारण्यकोपनिषद १०-९१-१३)

अतिसुंदर वस्त्रे घालून इच्छापुर्तीसाठी पत्नी पतीच्या हदयाला अलिंगन देते त्याप्रमाणे तू या परमेश्वराला अलिंगन दे. या अलिंगनातून माधुर्यभक्ती प्रगट होते.

ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– II
Nov – Dec 2022
OPEN ACCESS
Original Research Article

" श्रीमद्‌भगवदगीते"त ही भगवंताला प्रिय व अर्जुनाला प्रिया असे संबोधिले आहे.

" तस्मात्प्रणय्य प्रणिधाय कायं प्रसादये त्वमहमीशमीडयम
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः प्रियः यहिसि देव सोहम्।।"

(गीता – ११-४४)

ज्ञानदेवांनीही आपल्या "ज्ञानदेवी" मध्ये मधुराभक्तीचे वर्णन केले आहे.

" कां उखिते आंगे जीवे। आपणपे दिधले जिया मनोभावे
तिया कांत मिनलिया न राहावे। हृदय जेवी"

(ज्ञानेश्वरी – ११-५७७)

ज्या स्त्रीने आपले तन मन व आत्माही मनोभावाने आपल्या पतीस अर्पण केला आहे. अशा पतिव्रता स्त्रीस पतीची गाठ पडल्यावर जशी मनातील गोष्ट उत्कट प्रेमामुळे सांगितल्याशिवाय राहवत नाही. या उत्कट प्रेमालाच "मधूराभक्ती" म्हणतात. पुरुष व स्त्रीमध्ये असलेली कामासक्ती जशी माधुर्य दाखविते त्याप्रमाणे भगवंताच्या ठिकाणी संपूर्ण अंगामध्ये प्रत्येक अवयवावर प्रेम करणे म्हणजे माधुर्यभक्ती होय. सृष्टीच्या आरंभी आत्मा एकटाच होता. तो आत्मा पतिपत्नीरुपाने व्दिधा झाला हेच शिवशक्तीरुपी शुध्द ब्रहास्फूरण आहे. यात अत्यंत अव्दैत कायम राहूनच भक्तीचा आनंद प्राप्त होत असतो. हेच भक्त आणि भगवंत यांचे स्वरुप आहे. संत ज्ञानोबारायही आपल्या "अमृतानुभवा"त शिवशक्तीरुपी शुध्द ब्रहास्फूरणाला नमस्कार करतात.

"शिवशक्ती समावेशे। नमन केले मी ऐसे
रंगागर्भ आकाशी। रिगाला जैसा"

(अमृतानुभव- १, ओवी-६४)

हे शिवशक्तीचे ऐक्य म्हणजेच परमेश्वराचे स्वरुप आहे. म्हणूनच वेदकाळापासून ऋग्वेद, यजुर्वेद उपनिषदां-मधुन पतीपत्नीरुपाने देवतांची स्तुती करुन भक्ती केली ती माधुर्यभक्ती होय.

अशा प्रकारे मधुराभक्तीचे वैदिक काळातील स्थान अधिक सुस्पष्ट होते. वैदिक काळातील मधुराभक्तीला अनुसरुन स्वतःला राधिका मानुन प्रज्ञाचक्षू संत श्री गुलाबराव महाराजांनी कृष्णाची भक्ती केली त्या भक्तीला मधुरा भक्ती म्हणतात. त्यांनी केलेले भक्तीचे विवेचन पुढीलप्रमाणे-

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

**संत गुलाबरावमहाराजांनी वर्णिलेले भक्तीचे सोळा प्रकार :-**

संत गुलाबराव महाराजांच्या मधुराभक्तीवर संत ज्ञानदेवांच्या भक्तिसंकल्पनेचा प्रभाव आपणास पहावयास मिळतो. त्यांनी स्थापन केलेल्या मधुराव्दैत संप्रदायाची आदिनाथ शंकर, मच्छिंन्द्रनाथ, गोरक्षनाथ, निवृत्तीनाथ ज्ञानेश्वर महाराज अशी गुरुपरंपरा आहे. मधुराव्दैत संप्रदाय वारकरीसंप्रदायाची एक शाखा आहे. महाराजांना ज्ञानदेवांनी अनुग्रह दिला आहे. त्यामुळे गुरुस्थानी ज्ञानदेव आहेत. संत ज्ञानदेवांची भक्तिसंकल्पना

" जे जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत
हा भक्तियोगु निश्चित। जाण माझा।।"

(ज्ञानेश्वरी -१०-११८)

शिरोधार्य मानून या भक्तीसाठी अव्दैताची अनुभूती महत्वाची आहे.

" तैसी क्रिया कीर न साहे। तरी अव्दैती भक्ती आहे
हे अनुभवाचे जोगे। नोहे बोला ऐसे"

(ज्ञानेश्वरी — १८-११५१)

ही अनुभूती गुलाबराव महाराजांनी मधुराव्दैत संप्रदायाची निर्मिती करुन भक्तीच्या सोळा नव्या प्रकाराची मांडणी करुन जगापुढे प्रगट केली.

वैदिक काळापासून ऋषीमुनींनी अनेक प्रकारची भक्ती केली. "गीते" मध्ये भक्तीच्या प्रकारांचे दोन तीन पध्दतींनी वर्णन केलेले आढळते. आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी तसेच नवविधा भक्ती, लालन, वात्सल्य, माधुर्य, गौणी व परा इत्यादी प्रकारांचे वर्णन गीतेत केले आहे. संत ज्ञानदेवांनीही या सर्व प्रकारांचे वर्णन "ज्ञानेश्वरी" "अमृतानुभव" "अभंगगाथा" "चांगदेव पासष्टी" या ग्रंथांमधून विषयाला अनुसरुन केले आहे. संत गुलाबराव महाराजांनी आपल्या गोविंदानंद सुधा" "प्रीतिनर्तन" व "भगवद्भक्तीसौरभ" या ग्रंथामधून भक्तीच्या प्रकारांचे वर्णन करुन भक्तीवाङमयात मोलाची भर टाकली. श्री गुलाबराव महाराजांनी वर्णिलेले भक्तीचे प्रकार पुढीलप्रमाणे:-

भक्तिप्रकाराचा आराखडा

भक्ती

- गौणी (ज्ञानपूर्व उपासना)
  - १) श्रवण – परीक्षितराजा.
  - २) कीर्तन- नारदमुनी.
  - ३) स्मरण – प्रल्हाद
  - ४) पादसेवन - लक्ष्मी
  - ५) अर्चन- पृथु.
  - ६) वंदन- अक्रूर
  - ७) दास्य- हनुमान
  - ८) सख्य - अर्जुन
- मध्यमा
  - आत्मनिवेदन
    - वियोग
      - ९) ममतासमर्पण
      - १०) अहंतासमर्पण
  - ११) तस्मैवाहम् (लालन)
- परा
  स एवाहं: माधुर्य
  - १२) ममैवासी (वात्सल्य)
    - संयोग
      - १३) गुप्तसंयोग
      - १४) स्पष्ट संयोग
    - वियोग
      - १५) गुप्त वियोग
      - १६) स्पष्ट

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

संत गुलाबराव महाराजांनी भक्तीचे प्रथम तीन प्रकार केले आहेत.

१) गौणी, २) मध्यमा ३) पराभक्ती व त्यांचे पुन्हा सोळा प्रकारात वरीलप्रमाणे् विभाजन केले आहे. तर गौणी भक्तीत नवविधा भक्तीतील नववे आत्मनिवेदन सोडून आठ प्रकार समाविष्ट केले आहेत.

संत एकनाथांनी "श्रीमदभागवत" स्कंध ७ ला अनुसरुन आपल्यास "भागवता"त भक्तीच्या मुख्य प्रकारांचे वर्णन केले आहे. त्यालाच नवविधाभक्ती असे म्हणतात. या भक्तीच्या प्रकाराचे वर्णन नाथांनी "भागवता"त पुढील प्रमाणे केले आहे.

" श्रवणं कीर्तनं विष्णोस्मरणं पादसेवनम्
अर्चनं. वंदनं, दास्यं, सख्यामात्मनिवेदनम्"

(भागवत स्कंध ७-५-२१)

१) **श्रवणभक्ती** :- म्हणजे सर्वकाही ऐकून सोडावे. त्यात जे सार असेल तेवढयाचा मात्र संग्रह करावा अशी ही श्रवणभक्ती आहे. श्रवणामुळे ज्ञान वाढते. मनाचा व बुध्दीचा विकास होतो. नाथ लिहितात भगवंताच्या कथा श्रध्देने ऐकणे. भगवंताचे ध्यान करणे्, जे काही मिळेल ते सर्व भगवंताला अर्पण करणे आणि भगवंताचे अनन्य दास्यत्व पत्करुन मनबुध्दी आत्म्यासकट भगवंताला अर्पण केल्याने अनंत फलाची म्हणजे मोक्षाची प्राप्ती होते. असे स्वतः भगवंत उध्दवाला म्हणतात. सतं एकनाथ वर्णन करतात.

" जडित कुंडले मंडित कान। ते श्रवणासी नोहे मंडण
श्रवणाशी श्रवण भूषण। श्रवणे श्रवण सार्थक"

(ए. भा. ११ -१२३९)

रत्नजडित कुंडले घालून कान श्रृंगारले, तर त्यामुळे काही कानांना भूषण नाही तर ऐकणे हेच कानाचे भूषण आहे. कथाश्रवणाने कानाचे सार्थक होते. त्यामुळे श्रवणभक्ती ही नवविधा भक्तीची पहिली पायरी आहे.

२) **कीर्तनभक्ती** :- कीर्तनभक्तीत ईश्वराच्या लीलेचे वर्णन केले जाते. त्यामुळे कीर्तनात श्रोते वक्ता एक होऊन भगवद्मय होतात. म्हणून कीर्तनभक्ती श्रेष्ठ आहे. नाथ "भागवता"च्या अकराव्या अध्यायात कीर्तनाचे स्वरुप सांगताना म्हणतात.

" रामकृष्ण हरि गोविंदं। ऐशिया नामाचे प्रबंध

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

गाता नाना पदे छंद बंध। करावा विनोद कीर्तनी''

(ए. भा. ११-७३२)

रामकृष्ण, हरी, गोविंद अशा नामाची काव्ये गात असताना त्यातील अनेक प्रकारची पदे, चित्रबंध हयांनी कीर्तनामध्ये आनंदी आनंद करावा. त्यामुळे परमेश्वराची भक्ती घडून येते. अशाप्रकारे परमेश्वराची कीर्तनसेवा केल्याने प्रत्येकाला मुक्ती मिळते. कीर्तन कसे असावे याची नियममर्यादा नाथांनी एका अभंगात घालून दिली आहे.

" संगुणचरित्रे परमपवित्रें सादर वर्णावी। सज्जनवृंदे मनोभावे आधी वंदावी।। १।।
संतसंगे अंतरंगे नाम बोलावे। कीर्तनरंगी देवासन्निध सुखे डोलावे।।२।।
भक्तिज्ञानविरहित गोष्टी इतरां न कराव्या/ प्रेमभरे वैराग्याच्या युक्ती विवराव्या।।३।।
जेणेंकरुनि मूर्ती ठसावी अंतरी श्रीहरीची। ऐशी कीर्तनमर्यादा आहे संतांच्या घरची।।४।।
अव्दयभजनें अखंड स्मरणें वाजवी करटाळी। एकाजनार्दनी मुक्त होय तत्काळी।।५।।

(ए.गा.अ.क्रं. १६७५)

अशारीतीने कीर्तनभक्ती सर्वश्रेष्ठ आहे. नाथ "भागवता"त म्हणतात ईश्वरप्राप्तीसाठी कीर्तनासारखे दुसरे साधन नाही.

" आवडी करितां हरिकीर्तन। हृदयी प्रगटे श्रीजनार्दन
त्याहोनि श्रेष्ठ साधन। सर्वथा आन असेना.

(ए.गा. ५-३५१)

आवडीने जर हरिकीर्तन केले तर हृदयामध्ये ईश्वर प्रगट होतो. त्याच्यापेक्षा दुसरे श्रेष्ठ साधन आताच्या युगामध्ये काहीच नाही.

२) **विष्णोस्मरण** :- तिसरी भक्ती नामस्मरण किंवा "विष्णोस्मरण" ही होय. नामस्मरण भक्तीला सर्वच संतांनी महत्त्व दिले आहे. चालता, बोलता, खातापिता सुखी होता त्याच प्रमाणे अनेक उपभोग भोगताना नामस्मरण करावे. नामस्मरणाला कोणतेही बाहय साधन लागत नाही.

" साधनीं माझी मुख्यभक्ती। त्यात विशेषें नामकीर्ती
नामें चित्तशुध्दी चित्ती। स्वरुपस्थिती साधका"

(ए. भा. २३-६४७)

ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– II
Nov – Dec 2022
OPEN ACCESS
Original Research Article

सर्व साधनात परमेश्वराची भक्ती प्रमुख आहे. त्यात नामाची कीर्ती विशेष आहे. नामाने चित्तशुध्दी होते आणि साधकांना स्वरुपस्थिती प्राप्त होते.

४) **पादसेवन:-** चौथी भक्ती “पादसेवन” होय. पादसेवन मूर्तीचे करता येत नाही. म्हणून सदगुरुंचेच पादसेवन करावे. ते “भागवतात” लिहितात.

“ कापूर घातलिया जळी। स्वयें विरोनी जळ परमळी
तेवि अहं जाऊनि सेवा सकळी। सर्वी सर्वकाळी गुरुचरणी”

(ए. भा. १८-२८७)

जळात टाकलेला कापूर ज्याप्रमाणे स्वतःचे अस्तित्व विसरुन त्या पाण्याला सुगंधित करुन टाकतो. त्याप्रमाणे गुरुसेवेत भक्त मग्न होतो. अशी गुरुसेवा म्हणजे सदगुरुचे पादसेवन होय. नाथांनी सदगुरु जनार्दनस्वामींची सेवा अशाचप्रकारे केली व स्वतः जनार्दन बनले.

५) **अर्चनभक्ती:-** पांचवी भक्ती “अर्चन भक्ती” होय. अर्चनभक्ती म्हणजे देवतार्चन. ज्याची जी देवता असेल तिचे त्याने पूजन करावे. “भागवता”च्या अकराव्या अध्यायात नवविधा भक्तीच्या विवरणात अर्चनभक्ती म्हणजे काय सांगितले आहे.

“ सर्वभावे अवंचन। कवडी कोटीधन
जेणे केले मदर्पन। माझे अर्चन या नांव”

(ए. भा. ११-१२१३)

सर्वतः निष्कपटपणा ठेवून कवडीपासून कोटयावधी पर्यंत असलेले द्रव्य ज्याने परमेश्वराला अर्पण केले. त्याच्या त्या अर्पण कार्यालाच परमेश्वराचे “अर्चन”असे म्हणतात.

६) **वंदन भक्ती:-** सहावी भक्ती “वंदन” होय. देव, संत, साधू आणि सज्जन यांना नमस्कार करावा. नाथ “भागवता”त म्हणतात.

“ सप्रेम करितां नमन। नित्य नूतन समाधान
त्या नमनाचे लक्षण। लोटांगण दंडवत”

(ए. भा. २७-३५२)

भगवंताला सप्रेम नमन केले असता नित्य नवे समाधान लाभते अशा नमनाचे लक्षण म्हणजे लोटांगण आणि दंडवत घालणे.

ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022
OPEN ACCESS
Original Research Article

७) **दास्य भक्ती :-** सातवी भक्ती "दास्य" होय. देवव्दारी सदासर्वकाळ राहून लहान मोठे जे कार्य पडेल ते करावे. जीर्ण देवालयाचा उव्दार करणे. धर्मशाळा बांधणे. त्याचप्रमाणे दास्यभक्तीचे स्वरुप नाथ सांगतात.

"ऐक माझे भक्तीचे चिन्ह। माझ्या पर्वाचे अनुमोदन करी करवी आपण। दीनोध्दरण उपावो"

(ए. भा. ११-१२५६)

परमेश्वराच्या भक्तीचे लक्षण म्हणजे जो पुण्यदिवसांची व्रते करतो आणि दीनांचा उध्दार होण्याचे उपाय आपण स्वतः करतो व दुसऱ्याकडूनही करुन घेतो ती "दास्य" भक्तीचे होय.

८) **सख्य भक्ती :-** आठवी भक्ती "सख्य" जे देवास आवडते तेच आपणास आवडावे. या सख्यभक्तीमुळे उध्दव आणि श्रीकृष्ण हे एक झाल्याचे वर्णन नाथांनी "भागवता"त केले आहे.

" मी एकु देवो हा एकू भक्तु। हें ही विसरला श्रीकृष्णनाथू
हा देवो मी एकु भक्तु। ते उध्दवाआंतु नुरेचि"

(ए.भा. ११-१११९)

मी एक देव आणि हा एक भक्त हे ही श्रीकृष्णनाथ विसरुन गेले. आणि हा देव आणि मी भक्त हा भाव उध्दवातही उरला नाही.

वरील आठ भक्ती प्रकारांना अनुसरुनच संत गुलाबराव महाराजांनी भक्तीच्या आणखी आठ प्रकारांचे वर्णन केले आहे. ते पुढील प्रमाणे.

९) **ममतासमर्पण (आत्मनिवेदन):-** मला आवश्यक असलेले व माझी मालकी असलेले सर्व भववंताला अर्पन करणे म्हणजे ममतासमर्पण होय.

**उदा.** आपली सर्व धनसंपत्ती, संसार, प्रपंच, सर्ववस्तू माझ्या नसून परमेश्वराच्या आहेत या भावनेने सर्वस्व परमेश्वराला अर्पण करणे व माझेपणापासून स्वतःची सुटका करुन घेणे म्हणजे ममतासमर्पण होय.

१०) **अहंतासमर्पण "आत्मनिवेदन":-** ज्या देहाला आपण 'मी' समजतो तो देह परमेश्वराला अर्पण करणे. सर्व इंद्रिये व देहापासून बुध्दी अहंकारापर्यत सर्व ईश्वराला अर्पण करणे म्हणजे शेवटी 'मी' नसून भगवंतच आहे. असा अनुभव येणे म्हणजे अंहतासमर्पण होय.

उदा. सर्वच संत स्वतःच्या कार्याचे श्रेय शेवटी भगवंताला देतात. आत्मनिवेदन भक्तीत ममता व अहंता अर्पण केल्यावर भक्ताला अव्दैताची प्राप्ती होते.

**११) लालनभक्ती (तस्यैवाहम):-**

आत्मनिवेदनानंतर भक्त व भगवंत एकरुप होतात. मी भगवंताचा आहे अशी जाणीव निर्माण होते. या जाणीवेमुळे भक्त स्वतःकडे लहानपण घेतो व भगवंताला मोठेपण देतो. "मी भगवंताचा आहे" या जाणीवेने मातापिता समजून भगवंतावर अतिउत्कट प्रेम करतो. प्रेम माता, पती, पत्नी पिता, पुत्र, मित्र, दास, दासी हे माधुर्यप्रेम या प्रकारांच्या संबंधातून प्रगट होते.

भक्त आपला ज्ञानाभिमान घालविण्यासाठी भगवंताला "पिता"संबोधून हाका मारतो. एखादेवेळी आवडीने लडिवाळपणे "आई" संबोधून हाका मारतो. भगवानही लडिवाळपणानेच पितृत्व सोडून आई होऊन भक्ताचे लाड पुरवितो. अथवा गुरुनाच आईवडील समजून लालन भक्ती केली जाते असे गुलाबराव महाराज आपल्या "प्रीतिनर्तन" ग्रंथात म्हणतमात.

"नातरी भूक नसोनी पोटी। बाळ आक्रंदे मातृभेटी।
काहीच भय नसता नेहटी। थरथर कांपे।।६२।।
उगीच माती घाली मुखी। बेचव लागता होय दुःखी।
मग रडोणी म्हणे शेखी। कडिये घेई मज माये।।६३।।

(प्रीतीनर्तन अ.२, ओव्या ६२,६३)

आईने कडेवर घेतले की, आनंदाने हसतो. अशाप्रकारे हसून आणि रडून गुरुरुपी मातेचे मनोरंजन करतो. व लालनभक्ती प्रेम भगवंताला अर्पण करतो.

या माधुर्य प्रेमभक्तीचे स्वरुप अवर्णनीय आहे. नारद आपल्या "श्रीनारद भक्तीसूत्रे" या ग्रंथात म्हणतात.

"अनिर्वचनीयं प्रेमस्वरुपम"

(नारदभक्तीसूत्र- ५१)

अनिर्वाच्य प्रेम म्हणजे भक्ती. ही अनिर्वचनियता पाच प्रकारे संभवते.

१) जर मनुष्य मुका असेल तर त्याचे सगळे व्यवहार अनिर्वचनीय. न बोलताच घडतात.

२) एखादयास ना अध्यात्मज्ञान, ना स्वानुभव. मग तो परमात्म्याबद्दल प्रेमभक्तीबद्दल काय सांगणार? तो गप्पच बसेल.

३) सांगणारा शास्त्रज्ञानी आहे. परंतु स्वानुभवाच्या बाबतीत कोरडा आहे, तर केवल अनुभव गम्य अशा प्रेमभक्तिबद्दल तो काय बोलू शकेल?

४) कथाकारास स्वानुभव आला आहे. परंतू तो निखालस अडाणी आहे. त्यामुळे तर्क न्याय उपपत्ती प्रेमभक्तीबद्दल काय बोलू शकेल?

५) सांगणारा बहुश्रूत आहे आणि अपरोक्षानुभूती संपन्न आहे. तथापि प्रेमभक्तीच्या अनुभवांचे स्वरुपच एवढे अदभूत विलक्षण आहे की, त्या प्रत्ययाचे वर्णन वाणीव्दारे करणे सर्वथैव अशक्यच आहे. त्यामुळे अनिर्वचनीयता प्रगटते.

**१२) वात्सल्यभक्ती (ममैवासौ):-**

"ममैवासो" म्हणजे माझा भगवान आहे ही भावना म्हणजेच वात्सल्य भक्ती. या भक्तीप्रकारात भक्त स्वतःकडे मोठेपणा घेतो. लालनभक्तीप्रकारापर्यंत भगवंत भक्तासाठी कष्ट घेतो इथूनपुढे मात्र भगवंताला लहान मूल करुन भक्त स्वतः आई बनतो. लालनभक्तीमध्ये भगवंत पंढरीनाथ जनाबाईसाठी दळू लागला. दामाजीसाठी महार झाला. एकनाथांच्या घरी श्रीखंडया बनून पाणी वाहिले. इत्यादी कष्ट घेतले. या आठवणीने वात्सल्यभक्तीत भक्त भगवंताला बाळ करुन स्वतः आई बनून भगवंताची सेवा करतो. या वात्यल्य भक्त पुरुष असला तरी वात्सल्यप्रेमापोटी स्वतःकडे स्त्रीत्व घेतो व आई होतो व वास्तवात व्यवहार करणाऱ्या मूलाप्रमाणे व आईप्रमाणे भक्त आई बनून भगवंताची सेवा करतो. सतत स्वच्छ असणाऱ्या भगवंताला आंघोळ घालतो. सतत तृप्त असणाऱ्याला जेवण देतो. सर्वत्र व्यापून राहिलेल्या भगवंताला कडेवर घेतो हे सर्व वात्सल्यप्रेमामुळे करतो.

उदा. विश्वरुप पाहूनदेखिल यशोदेने वात्सल्यभक्ती सोडली नाही. एवढेच नव्हे तर भगवान श्रीकृष्ण आपल्या जातीबांधवांच्यासाठी गोकुळ सोडून मथुरेला गेला तरी यशोदेची वात्सल्यभक्ती अजिबात ढळली नाही.

**पराभक्ती (स एवाहं: माधुर्यभक्ती):-**

लालन व वात्सल्यभक्तीमुळे भक्ताचा बराचसा अभिमान कमी होतो. अशा वेळी "सएवाहम्" या समानाधिकरणाने एका पातळीवर येऊन बरोबरीच्या नात्याने भक्त भगवंतावर प्रेम करतो. या

"सएवाहम" प्रत्ययाला माधुर्याची जोड दिली की ती माधुर्यभक्ती होते. या भक्तीलाच गुलाबराव महाराज पराभक्ती म्हणतात. या पराभक्तीचे चार प्रकार पडतात.

१३) **गुप्तसंयोगरुपी माधुर्यभक्ती** :- भक्ताला त्याच्या अंतःकरणात भगवद्साक्षात्कार होतो पण वस्तुतः मात्र प्रपंचात त्याला दुःख देणाऱ्या सर्व वस्तू वैरी वाटतात. षडरिपू, बुध्दी, मन, अहंकार इत्यादी त्याच्या भगवद्प्राप्तीमध्ये व्यत्यय आणतात. त्यामुळे या षडरिपूंपासून बाजूला ह्रदयमंडलात तो भगवंताला ठेवतो. काही वेळेला या षड्रिपूंना स्वतःचे कुटूंब आहे अशी कल्पना करुन स्वतःकडे परस्त्रीपणा घेऊन व्यभिचारी बुध्दीने भगवंताकडून प्रेमसुख घेतो. संत गुलाबराव महाराजांनी या पदामध्ये.

" क्रोध माझा भरतार मेल्याला ठेवला दूरी।
मला लागली गोडी म्हणूनी मी हिंडते परव्दारी ।।
परपुरुष भोगिला परंतु पाप नाही आंगी।।धु.।।
बोधाच्या मदनांत सखे ग बाई मी झाली वेडी।
चित्त चांदण्यामध्ये सखे म्या टाकली पलंगडी।।

गुप्तसंयोगाचे अगदी बहारीने वर्णन केले आहे.

संत तुकारामांनीही एका अभंगरुपी विरहिणीत गुप्त संयोगी माधुर्य भक्तीतील भगवंताशी केलेल्या व्यभिचाराचे वर्णन केले आहे.

"अधिल्या भ्रतारे काम नव्हे पुरा
म्हणूनि व्यभिचार टेकलिये"[३५]

माझा अधिकृत भ्रतार आहे. त्याने माझी इच्छा पूर्ण केली नाही. हा भ्रतार म्हणजे अहंकार होय. प्रपंचात प्रदर्शन व परमार्थात आत्मदर्शन असते. या भ्रतारामुळे (अहंकारामुळे) माझी इच्छा पूर्ण झाली नाही. म्हणून मी परपुरुषाशी व्यभिचार करणार आहे. तो परपुरुष कोण? तर तो परपुरुष म्हणजे श्रीकृष्ण परमात्मा म्हणजेच भगवंत.

गुप्तसंयोगरुपी माधुर्यभक्तीचे वर्णन करताना गुलाबराव महाराज गोपिकांचे उदाहरण देतात :- गोकुळात राहणाऱ्या गोपिकांना घरच्या मंडळीचा जाच होता. त्यामुळे त्यांची सर्व ओढ श्रीकृष्ण परमात्म्याकडे लागली होती. काही कुमारिका गोपींनी कृष्णाला प्रसन्न करण्यासाठी कात्यायनी व्रत

ISSN–2277- 8721
Electronic International Interdisciplinary Research Journal
EIIRJ
Volume–XI, Special Issue– II
Nov – Dec 2022
OPEN ACCESS
Original Research Article

केले व बाहयतः श्रीकृष्णाला पती करुन घेतले. वास्तवात देखिल सगुण भगवंताचा संयोग होणे म्हणजेच गुप्त संयोगरुपी माधुर्यभक्तीचे फल आहे.[३६]

**१४) स्पष्ट संयोगरुपी माधुर्यभक्ती :-**

कात्यायनी व्रताच्या लाभामुळे श्रीकृष्ण परमात्म्याचा पती म्हणून लाभ होतो. म्हणजेच अंतःकरणातील भगवद्मूर्तीचा वास्तवातदेखित अनुभव घेता येतो. या अंतबाहय भगवंताच्या साक्षात्काराने सर्व इंद्रियांचा स्वामी श्रीकृष्ण परमात्मा आहे. असाच अनुभव येतो. यालाच स्पष्ट संयोगरुपी माधुर्यभक्ती म्हणतात.

**१५) गुप्त विप्रलंभरुपी माधुर्यभक्ती :-**

गुप्त विप्रलंभ म्हणजे हृदयातील भगवद्मूर्तीचा वियोग होणे. कृष्णपरमात्म्याबरोबर रासक्रीडा करत असतानाच कृष्णपरमात्मा आपल्यालाच मिळाला आहे. असा अभिमान गोपींच्या मनात निर्माण झाला. अर्थात भक्तीप्रेमात विघ्न निर्माण झाले.

" तासांतत्सौभगमद वीक्ष्य मानंच माधवः।
प्रशमाय प्रसादाय तत्रैवान्तस्थीयत।।"

(भागवत स्कंद -१०-अ.२९-४८)

गोपींच्यामध्ये मिर्माण झालेला सौभगमद नष्ट करण्यासाठी व त्यांच्यावर प्रसाद करण्यासाठी भगवान परमात्मा त्यांच्याच हृदयात अंतर्धान पावले. त्यामुळे त्यांना कृष्ण परमात्मा कुठेच दिसेना त्यामुळे गोपी या सगुण भगवंताच्या वियोगाने व्याकुळ होतात. परंतु गोपींना झालेला धन्यताअभिमान नष्ट करण्यासाठी अन्तर्धान पावतात. परंतु गोपींना

पुन्हा देहाभिमान होतो की काय या भयाने भगवान त्यांच्यावर कृपा करण्यासाठी त्यांना वियोग देऊन वियोग प्रेम वाढवितात. या वियोगोपलालनामुळे अंतःकरणात पुनः भक्तिरस पाझरु लागतो.

**१६) स्पष्ट विप्रलंभ माधुर्यभक्ती :-**

अंतर्बाहय सर्वत्र भगवंताचा वियोग अनुभवायला येणे म्हणजे स्पष्ट विप्रलंभ माधुर्यभक्ती होय.

"अंतरी बाहेरो उमटे शोक। शोका पाठीपोटी वज्रनायक।।"

गोपींच्या हृदयात कृष्णपरमात्मा लपल्याने आत बाहेरही त्यांना कृष्ण दिसेना तेंव्हा विरहाने त्या बेभान होवून शोक करतात. आत बाहेरही परमात्म्याच्या वियोगाने व्याकुळ होतात. परंतु या शोकापूर्वी भगवंताचा संयोग होतो व नंतरही संयोगच होणार होता. म्हणून या शोकाच्या पाठीपोटी वज्रनायक असल्यामुळे त्यांच्या अनुभवाला आतबाहेर चेतन ब्रहाच भासू लागले. सर्व जडभाव नाहीसा झाला.

ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– II
Nov – Dec 2022
OPEN ACCESS
Original Research Article

एक गोपी म्हणते वियोगाने माझे हृदय कठीण झाले आहे. म्हणून भगवान येत नाहीत की काय? मी जर शोकाचा रोध केला तर हृदय विदीर्ण होईल आणि हृदयातील भगवंत बाहेर निघून जाईल म्हणून "रडोन रडोन। हृदय रक्षी प्रियास्तव"

(प्रीतीनर्तन -६-८९)

अशा त-हेने कारुण्यभरीत गोपीची विरह आवस्था पाहून सद्‌गुरुमाऊलीला कळवळा येतो. ही गुरुमाऊली निर्गुणात लपलेल्या भगवंताकडे जाते व आपल्या कन्येच्य विरहाची व्यथा सांगते आणि विरहरुपी संकट दूर करते.

**सारांशः**

संत श्री गुलाबराव महाराज मधुराभक्तीच्या प्रसारात "परमविरहासक्ती" ला अतिशय महत्त्व देतात

"हरिपरमविरहासक्ति। माधुर्यभक्ति हा रसू"

(भक्तिपदतीर्थ- अध्याय ४-५७)

त्यांचे हे भक्तिप्रेम 'कान्तासक्ती' स्वरुपाचे आहे. संयोग प्रेमापेक्षा 'वियोगपेम' भक्तीमध्ये अतिशय उपयुक्त असल्याने महाराजांचे मत आहे. विरहाआवस्थेत भगवंताचे उत्कट ध्यान अनुभवता येते. तसेच "तव्दिस्मरणे परमव्याकुलता" ही प्रतीतीस येते. त्यातील गोडी विलक्षण आहे. भक्तीस संयोग असता जो 'वियोग' होतो. त्याला 'वियोगोपलालन' म्हणतात या अवस्थेत भगवंताशी अनुसंधान राहण्यास मदतच होते. गोपी भगवंताला नित्य पहात असत. पण प्रत्येकवेळी त्यांना पहिल्या भेटीइतकीच प्रत्येक नवीन भेटीसाठी ओढ वाटे. अशा विरहासक्तीत विकारिता नसते.

गोपींनी कृष्णाला एकदा पाहिलं की त्यांना कोटी रमण सुख मिळत असे. भगंवताच्या रुपाने गोपिका तन्मय होत होत्या. त्या रुपातील स्वतःला राधिका मानुन संत श्री गुलाबराव महाराजांनी कृष्णाची भक्ती केली. या भक्तीलाच माधुर्यभक्ती असे म्हणतात.

संत ज्ञानोबारायांच्या कृष्णभक्तीस त्यांच्या "अभंगगाथे"तील विरहिण्यांत व गौळणीत मधूर रुप धारण केले आहे. माता-पिता-बंधू-स्वामी यांच्यातील भावाला स्मरुण केलेल्या भक्तीत जेवढा ऐक्यानुभव येत नसतो तेवढा ऐक्यानुभव पती-पत्नी, प्रिया-प्रियकर या नात्यातुन केलेल्या भक्तीत येतो. त्यामुळे ज्ञानदेवांनी मधुराभक्तीचे विरहिण्यांमधुन केलेले वर्णन आकर्षक वाटते.

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

“धनु वाजे घुणघुणा। वारा वाजे रुणझुणा।
भवतारकु हा कान्हा। वेगी भेटावा कां।।१।।
चांदवो चांदणे। चापेवो चंदनु।
देवकीनंदनु। वीण नावडे वो।।२।।
चंदनाची चोळी। माझे सर्व अंग पोळी।
कान्हो वनमाळी। वेगी भेटवा कां।।३।।
सुमनाची सेज। सितळ वो निकी।
पोळे आगिसारिखी। वेगी विझवा कां।।४।।
तुम्ही गातसां सुस्वरे। ऐकोनी द्या उत्तरे।
कोकिळे वर्जावे। तुम्ही बाईयांनो।।५।।
दर्पणी पाहता। रुप न दिसे आपुले।
बापरुखमादेविवरे। विठ्ठले मज ऐसे केले।।६।।

(ज्ञानदेव अभंग गाथा-८७९)

संत ज्ञानदेवांच्या अनेक विरहिण्यांमधून गोपींच्या माधुर्य प्रेमाची जाणीव होते. त्यामुळे त्यांच्या भक्तीतील मधुरभाव प्रत्ययास येतो. या मधुरभावाला अनुसरुन त्यांनी कृष्णभक्ती केली. या मधुराभक्तीचा सांगोपांग विकास होण्यासाठी संत गुलाबराव महाराजांनी मधुराव्दैत संप्रदायाची स्थापना केली. त्यामुळे माधुर्यभक्तीची ओढ सर्वसामान्यांच्या मनात निर्माण झाली. या सांप्रदायातील उत्सवांनी आणि व्रतांनी माधुर्यभक्तीला अधिक बहारीच येते कात्यायनीचे व्रत, श्रीकृष्णजन्माष्टमीचे नवरात्र शिवरात्री व गुरुपौर्णिमा नृशिहजयंती, रामनवमी, दत्तजयंती हे उत्सव साजरे केले जात यातील कात्यायनीव्रत संत गुलाबराव महाराज स्त्री वेश धारण करुन महिनाभर करत असत. या संप्रदायाचा विशेषः म्हणजे कैलास हे माहेर त्याचा आळंदीशी समन्वय, व्रज (वृंदावन) हे सासर व शेवटी सासर माहेराचा अभेद हे या सांप्रदायाचे तत्वज्ञान आहे.

**संदर्भ सूची:**

- समन्वय महर्षी संत गुलाबराव महाराज – पृष्ठ क्रमांक – ३३
- संप्रदाय सुरतरु - पृष्ठ क्रमांक – २२
- भक्तीपद तीर्थामृत सुक्तरत्नावली प्रथमयष्टयन्तर्गत व्दितीयावृती -पृष्ठ क्रमांक – १७३

- बृहदारण्यकोपनिषद – १- ४- १३ :- पृष्ठ क्रमांक – ३०
- श्रीमद्भगद्गीता अध्याय – ११ श्लोक ४४
- सार्थ ज्ञानेश्वरी अध्याय – ११ ओवी – ५७७
- अमृतानुभव – प्रकरण -१ ओवी – ६४
- मधुराव्दैताचार्य श्रीगुलाबराव महाराज यांचे भक्तिशास्त्र - पृष्ठ क्रमांक – ३५
- श्रीमद्भागवत स्कंध-७ अध्याय -५ श्लोक – २१
- एकनाथी भागवत - अध्याय -११ ओवी- ७७२
- नारदभक्तीसूत्रे - सूत्र -५१ - पृष्ठ क्रमांक – ४७
- प्रीतिनर्तन अध्याय- २ ओवी- ३५

**संदर्भ ग्रंथ :-**


- समन्वय महर्षी संत गुलाबराव महाराज -लेखक - सौ. सुनिता आफळे, श्री. गुलाबराव महाराज जन्मशताब्दी प्रकाशन- रुईकर पथ महाल नागपूर – २
- संप्रदाय सुरतरु -प्रकाशक - शंकर जयराम सोमवंशी, श्री. ज्ञानेश्वर संस्था नागपूर,व्दितीया आवृत्ती १९३८
- भक्तीपद तीर्थामृत सुक्तरत्नावली प्रथमयष्टयन्तर्गत व्दितीयावृत्ती मधूर प्रकाशन कडकस चौक महाल नागपूर
- बृहदारण्यकोपनिषद – गीताप्रेस गोरखपूर पृष्ठ क्रमांक – ३०
- श्रीमद्भगवतगीता गोपाल कृष्णदास गोस्वामी भक्तीवेदांन्त ट्रस्ट मुंबई- प्रथमावृत्ती १९८१
- सार्थक ज्ञानेश्वरी संपादक श. वा. दांडेकर, प्रकाशक वि. ना. भंडारे, स्वानंद प्रकाशन पुणे- आठवी आवृत्ती.
- श्रीअमृताअनुभव विवरण, संपादक गंगाधर देवराम खानोलकर, प्रकाशक - केशव भिकाजी ढवळे मुंबई
- मधुराव्दैताचार्य श्रीगुलाबराव महाराज यांचे भक्तिशास्त्र- लेखक कृ. मा. घटाटे, प्रकाशक - भैयासाहेब टाकरे चांदुरबाजार अमरावती.
- श्रीममद्भागवत, गो. स्वामी रामानंदाचार्य प्रकाशन- गिता प्रेस गोरखपूर


**Cite This Article:**

***डॉ. विजय सोपानराव शेडगे, (2022)*** महाराष्ट्र तत्वदर्शन: संत श्रीगुलाबराव महाराजांच्या ज्ञानेश्वर मधुराव्दैत संप्रदायांचे तत्वज्ञान, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No. XI (Special Issue-II), 1-18.*